म. ग्रं. सं. ठाणें
वेष्टन किरकोळ
नं. २०३
१०९

म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
विषय क्रमांक ५०
लेखक मे. टी. क्षीरे
सन १८९१
३०३
पुस्तकाचें नांव मराठी दुसरें पुस्तक

कि२

[illegible]

[illegible]

# MARÂTHÎ READING SERIES.

DEPARTMENT OF PUBLIC INSTRUCTION

BOMBAY

## BALABODHA SECOND BOOK.

*Price 1½ Anna.*

The Department of Public Instruction, Bombay.

# MARÂTHÎ SECOND BOOK.

BY


MAJOR T. CANDY.

THE LATE MARÂTHÎ TRANSLATOR, E. D.



FIFTEENTH EDITION.— 1,00,000 COPIES.



*Registered for copy-right under the Government of India's Act XXV of 1867.*



Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1891.



[ All rights reserved. ]


*Price 1½ Anna.*

BOMBAY:
PRINTED AT THE "NIRNAYA-SAGARA" PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# मराठी दुसरें पुस्तक.

हें

मेजर टी. क्यांडी,

माजी मराठी ट्रॅन्स्लेटर ए० डि०

ह्यानीं केलें.

आवृत्ति पंधरावी.

१,००,००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई:

गवर्नमेंट सेंट्रल बुक डीपो.

सन १८९१ इसवी.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे अधिकार सरकारानें आपल्याकडे ठेविले आहेत.

किंमत १।। आणा.

मुंबईमध्यें
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

# दुसऱ्या पुस्तकाची अनुक्रमणिका.


| धडा. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | उपदेश ... ... ... ... ... ... | १ |
| २ | कुत्रा डसलेला मनुष्य ... ... ... ... | २ |
| ३ | एका अरबी घोड्याची गोष्ट. ... ... ... | ३ |
| ४ | रबर ... ... ... ... ... ... | ४ |
| ५ | माती ... ... ... ... ... ... | ५ |
| ६ | काच ... ... ... ... ... ... | ६ |
| ७ | आंधळा माणूस आणि लंगडा माणूस ... ... | ८ |
| ८ | मुलाची समजूत ... ... ... ... ... | ९ |
| ९ | मातीचें चित्र ... ... ... ... ... | १० |
| १० | बाप आणि मुलगी ... ... ... ... | १२ |
| ११ | अंबाडी ... ... ... ... ... | १३ |
| १२ | म्हातारा आणि त्याचे लेंक ... ... ... | १५ |
| १३ | गांवढेकर आणि साप ... ... ... ... | १६ |
| १४ | दोन वाटसरू ... ... ... ... ... | १७ |
| १५ | आकृति ... ... ... ... ... ... | १८ |
| १६ | वेडें कोंकरूं ( कल्पित गोष्ट ) ... ... ... | १९ |
| १७ | वेडें कोंकरूं कल्पित गोष्ट ( पुढें चालू ) ... | २१ |
| १८ | आरसा पाहणारीं भावंडें ... ... ... | २४ |
| १९ | शेतकरी आणि त्याचा कुत्रा ... ... ... | २५ |

| धडा. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| २० | गरीब आईबापांचा चांगला मुलगा ... ... | २७ |
| २१ | लांडगा आणि करडूं ( कल्पित गोष्ट ) ... | २९ |
| २२ | आज्ञा ... ... ... ... ... ... | ३१ |
| २३ | बहीण आणि भाऊ ... ... ... ... | ३३ |
| २४ | परशुराम आणि कृष्णी ... ... ... ... | ३६ |
| २५ | वारा, पाऊस ... ... ... ... ... | ३८ |
| २६ | सोनें, रुपें आणि तांबें ... ... ... ... | ४० |
| २७ | पोपट ... ... ... ... ... ... | ४२ |
| २८ | कोंबडा ... ... ... ... ... ... | ४४ |
| २९ | सकाळ, संध्याकाळ आणि दिशा ... ... | ४६ |
| ३० | तंबू ... ... ... ... ... ... | ४७ |
| ३१ | पारा, लोखंड आणि कथील ... ... ... | ४९ |
| ३२ | चिमणी... ... ... ... ... ... | ५१ |
| ३३ | शेत, नांगर, बैल व कुणबी ... ... ... | ५३ |
| ३४ | गोगलगाय ... ... ... ... ... | ५५ |
| ३५ | स्वच्छपणा ... ... ... ... ... | ५६ |
| ३६ | खार ... ... ... ... ... ... | ५८ |
| ३७ | ससा ... ... ... ... ... ... | ६० |
| ३८ | माधवराव आणि गणू ... ... ... ... | ६१ |
| ३९ | शब्द सोडलेला धडा १ ... ... ... | ६३ |
| ४० | शब्द सोडलेला २ ... ... ... ... | ६५ |
| ४१ | इटीदांडूचा खेळ ... ... ... ... | |
| ४२ | वाचन ... ... ... ... ... ... | |

| धडा. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४३ | विंचू ... ... ... ... ... ... | ७१ |
| ४४ | कविता ... ... ... ... ... ... | ७२ |
| ४५ | " ... ... ... ... ... ... | ७४ |
| ४६ | " ... ... ... ... ... ... | ७५ |

# दुसरें पुस्तक.

## धडा १.

### उपदेश.

अरे मुला, तूं माझें ऐक. मी तुला तुझ्या बऱ्याची गोष्ट सांगतों. तूं कधीं खोटें बोलूं नको, कधीं कोणाशीं लबाडी करूं नको. मोठ्या लाभासाठीं देखील खोटें बोलूं नको आणि लबाडी करूं नको. खोटें बोलणें हें मोठें पाप होय. ह्या पापाचा दंड देव करीलच करील. तुझा खोटेपणा जरी दुसऱ्या माणसास कळला नाहीं तरी तो ईश्वरास कळतो, आणि तो तुजपासून त्याचा जाब घेईल.

बहुतकरून लबाड लोकांची लबाडी दुसऱ्या माणसांस कळून येते; आणि कोणाची लबाडी एक वेळ उजेडास आली ह्मणजे मग त्याची अब्रू राहत नाहीं. खरा व विश्वासाचा जो माणूस तो सर्वांस आवडतो [illegible] नाहीं; त्याशी अब्रू एकदा गेली ह्मणजे ती फित्यर मिळावयाची नाहीं.

वागून आपणावर जो आहे त्याच्या हुकुमांत राहतो त्याजवर सर्वांची प्रीति असते.

आईबापांची मर्यादा राखणें आणि त्यांच्या आज्ञेंत राहणें ह्यासारखें मुलांस दुसरें भूषण नाहीं.

---

## धडा २.

### कुत्रा डसलेला मनुष्य.

एका मनुष्यास कुत्रा डसला. त्यास एका म्हातारीनें उपाय सांगितला कीं, भाकरीचा तुकडा घेऊन घायावर लाव; मग तो तुकडा त्या कुत्र्याकडून खावीव, म्हणजे विष उतरेल.

तो मनुष्य त्याप्रमाणें करितो आहे इतक्यांत एक शहाणा मनुष्य त्या वाटेनें जात होता; त्यानें त्यास पुसलें, अरे, हें तूं काय करितोस? तेव्हां घायाळानें त्याला कच्चें वर्तमान सांगितलें.

तें ऐकून शहाणा म्हणतो, रे रे, असें जर आहे तर मी तुजपाशीं मागून घेतों कीं, हें तूं फार चोरून कर. जर का हें वर्तमान ह्या शहर-

[illegible] कही मनुष्य

काच अगदीं गुळगुळीत असते. ज्या पदार्थांची काच होते त्यांतून पलीकडचा पदार्थ दिसत नाहीं, तरी काचेंतून पलीकडचा पदार्थ दिसतो; व काच जितकी अधिक स्वच्छ असेल तितका तो अधिक स्पष्ट दिसतो.

काचेचीं भांडीं फार स्वच्छ असतात, व कितीएक फार सुंदर असतात. ह्या भांड्यांत कोणताही पदार्थ ठेविला तरी तो कळंकत नाहीं.

हिंदु लोकांत काचेचीं भांडीं बहुतकरून नसतात, पण साहेब लोकांत पुष्कळ असतात.

भिंगाच्या मागें पारा व कथील लाविलें ह्मणजे आरसा होतो. कितीएक लोक नुसतीं भिंगेंच तसबिरींवर लावितात.

काच फार ठुसकर असते; काचेचा पदार्थ एकदा फुटला ह्मणजे तो चांगला जडला जात नाहीं.

मुलांनो, अब्रू ही काचेसारखी आहे. काचेचें भांडें एकदा फुटलें ह्मणजे जसें नीट होत नाहीं, तशी अब्रू एकदा गेली ह्मणजे ती फिरून मिळावयाची नाहीं.

## धडा ७.

### आंधळा माणूस आणि लंगडा माणूस.

एक आंधळा माणूस वाट चालत असतां, त्यास एके जागीं बिकट वाट लागली. तेथें एका लंगड्या माणसाची गांठ पडली.

तेव्हां लंगड्यास आंधळा ह्मणतो, बाबारे, मला ह्या विकट वाटेंतून पार ने. लंगडा त्यास उत्तर करितो, गड्या, हें माझ्यानें कसें होईल? मीच मोठ्या संकटानें चालतों; मग दुसऱ्यास माझ्यानें पार कसें करवेल? एक मात्र उपाय दिसतो, तो असा; तुझे हातपाय चांगले खबरदार आहेत, तर तूं मला खांद्यावर घेऊन चाल, ह्मणजे मी तुला वाट सांगेन; ह्याप्रमाणें माझे डोळे तुझ्या कामास पडतील, आणि तुझे पाय माझ्या कामास पडतील; असें करून आपण दोघे पार पडूं.

आंधळा उत्तर करितो, गड्या, फार चांगली गोष्ट सांगितली. आपण एकमेकांच्या कामीं पडूं असेंच करूं. असें बोलून आंधळा होता तो लंगड्यास खांद्यावर घेऊन चालला. आणि चांगल्या रीतीनें ते दोघे पार पडले.

## धडा ८.

### मुलाची समजूत.

काशिनाथ ह्मणून एक पांच वर्षांचा मुलगा होता. त्याची आई एके दिवशीं बरणींतून गूळ काढित असतां तो तिच्याजवळ पुष्कळ गूळ मागूं लागला. तेव्हां जंतांचा विकार न व्हावा ह्मणून ती त्यास सुपारीएवढा गूळ देऊं लागली. तो थोडा असें ह्मणून तो घेईना, आणि पुष्कळ दे असें बोलून रडत रडत जमिनीवर गडबडां लोळूं लागला. मग ती पेरूएवढा गूळ देऊं लागली, तरी पुष्कळ दे हें त्याचें ह्मणणें सुटून रडणें बंद होईना. शेवटीं ती त्याला आंब्याएवढा गूळ देऊं लागली, तरी त्याची समजूत होऊन रडें बंद होईना.

मग त्या मुलाच्या आजीनें एका हातांत बोराएवढा व एका हातांत सुपारीएवढा गूळ घेऊन दोनही हात त्या मुलापुढें करून, ह्यांत पुष्कळ कोणता, असें ती त्या मुलास पुसूं लागली. त्या वेळीं जो सुपारीएवढा होता तो पुष्कळ असें त्या मुलानें सांगितलें; तेव्हां, जो पुष्कळ असेल

तोच घे, असें त्याच्या आजीनें ह्मटल्यावरून त्यानें सुपारीएवढा गूळ घेतला; आणि तेणेंकरून त्याची चांगली समजूत झाली.

तात्पर्य.

शहाणीं मनुष्यें दुसऱ्याचें मन खुष ठेवून आपलें कार्य साधीत असतात.

---

## धडा ९.

### मातीचें चित्र.

एक मुलगा आपल्या मामाच्या घरीं गेला, तेव्हां मामानें त्यास दोन मातीचीं चित्रें दिलीं, आणि तो ह्मणाला, चिंतू, आज मी जत्रेस गेलों होतों तेथून हीं चित्रें आणिलीं, एक तुझ्याकरितां आणि एक मनीकरितां.

चिंतू ह्मणाला, ह्यांत माझें कोणतें, आणि मनीचें कोणतें? मामा ह्मणाला, दोन्ही सारखींच आहेत, तुला पाहिजे तें तूं घे, आणि दुसरें मनीला दे.

मामानें दिलेलीं चित्रें आईस केव्हां दाखवीन असें त्यास झालें होतें. तो धावत धावत चालला तों ठेंच लागून पडला, आणि दोहों-

तील एक चित्र फुटलें. त्याचे सारे तुकडे धोतरांत बांधून तो घरीं आला.

घरीं येतांच चिंतूनें आपल्याजवळचें चित्र आणि फुटक्या चित्राचे तुकडे आईस दाखविले, आणि तो ह्मणाला, आई, हें पहा माझें चित्र कसें आहे; हें मला मामानें दिलें. मनीला असेंच दिलें होतें तें फुटलें. त्याचे हे तुकडे मीं जमा करून आणिले आहेत, ते मनीला नेऊन देतों.

आई ह्मणाली, फुटलें तेंच चित्र मनीचें कशावरून? चिंतूनें उत्तर दिलें, मामा ह्मणाला होता कीं, दोन्ही सारखींच आहेत; तुला पाहिजे तें तूं ठेव, आणि दुसरें मनीला दे.

हें ऐकून आई हसली. ती ह्मणाली, जर मामानें हीं चित्रें मनीच्या हवालीं केलीं असतीं, आणि तिनें एक वाटेंत फोडून तुजकडे आणिलें असतें, तर तूं तें फुटकें चित्र घेतास काय? हें आईचें बोलणें ऐकून चिंतू ओशाळा झाला.

---

## धडा १०.

### बाप आणि मुलगी.

**मुलगी**—बाबा, सोमा गवळी दूध घेऊन आला आहे. तो ह्मणतो, किती दूध घालूं?

**बाप**—मुली, त्याला सांग कीं, आज शेरभर दूध पुरे; उद्यां दोन शेर घेऊन ये.

**मु०**—बाबा, गवळी दूध कोठून आणितो?

**बा०**—तुला ठाऊक नाहीं काय? त्याच्या घरीं गाई आहेत, ह्मशी आहेत, त्यांचें दूध काढून तो आणितो.

**मु०**—बाबा, गाय किती दूध देते आणि ह्मैस किती देते?

**बा०**—एकेक गाय दोन दोन शेर दूध देते, आणि ह्मैस चार चार शेर देते.

**मु०**—सोमाच्या घरीं गाई ह्मशी पुष्कळ असतील?

**बा०**—होय, दोन गाई आणि चार ह्मशी आहेत.

**मु०**—तो इतक्यांच्या दुधाचें काय करितो?

**बा०**—जसा आमच्या घरीं दूध घालतो

तसा आणखी पुष्कळांच्या घरीं दुधाचा रतीब घालतो. रतीब घालून दूध राहिलें तर तें तो हलवायास देतो.

मु०—हलवाई दुधाचें काय करितो?

बा०—हलवाई दुधाचा खोवा करून त्याचे पेढे करून विकतो.

मु०—बाबा, पेढा दुधापेक्षां गोड असतो. दूध तसें गोड नसतें.

बाप—वेडे मुली, त्यांत साखर घालतात ह्मणून तो गोड होतो.

---

## धडा ११.

### अंबाडी.

खानदेश, अहंमदनगर, सोलापूर, बेळगांव, पैठण वगैरे प्रांतांत हीं झाडें लावितात. जोंधळे बाजरी वगैरे धान्यें पेरतात, तेव्हां त्यांत अंबाडी लावितात. तिचें स्वतंत्र शेत किंवा मळा कांहीं नसतो. तिच्या झाडांची उंची सुमारें, तीन हात असते. त्यांस आडव्या तिडव्या डाहळ्या फुटत नाहींत, तीं केवळ सरळ वाढतात. तीं कोंवळीं असतात तेव्हां त्यांच्या

पाल्याची भाजी करितात, आणि जून झालीं ह्मणजे तीं उपटून काढितात; नंतर बीं काढून घेऊन त्यांच्या जुड्या बांधितात. त्या जुड्या नदीच्या कांठीं पाण्यांत खळगा खणून त्यांत पुरून ठेवितात. मग आठ पंधरा दिवसांनीं त्या जुड्या काढून वरची साल काढून घेतात, तिला वाक असें ह्मणतात; त्याचे दोर व तरटें करितात.

अंबाडीच्या बियांचें तेल निघतें, व त्या अंबाड्या जनावरांला खावयास घालतात. पूर्वीं दुष्काळांत गरीबगुरिबांनीं त्यांच्या देखील भाकरी करून खाल्ल्या. अंबाडीच्या दोऱ्या कापडाचे गट्ठे बांधावयास व गुरांचीं दावीं करावयास उपयोगीं पडतात. अंबाडीचें झाड एकाद्या गैरमाहीत मनुष्यानें पाहिलें असतां त्यास असें वाटेल कीं, ह्या झाडापासून काय व्हावयाचें आहे? परंतु ह्या झाडापासून जे लाभ होतात ते त्यांचा शोध केल्यावांचून समजावयाचे नाहींत. ह्याप्रमाणेंच ईश्वराचीं बहुतेक कामें आहेत.

## धडा १२.

### झातारा आणि त्याचे लेंक.

एका झाताऱ्यास पांच लेंक होते, ते आपआपणांत नित्य भांडत; झणून त्यानें त्यांस धमकी देऊन पाहिलें, गोडीगुलाबीनेंही पुष्कळ सांगितलें. परंतु तें सर्व फुकट गेलें.

तेव्हां शेवटीं त्यानें ही तोड काढिली. त्या लेंकांस आपल्याजवळ बोलावून त्यानें काठ्यांची एक जुडी आणविली, आणि प्रत्येकास सांगितलें कीं, तुझ्यांत जितका जोर असेल तितका करून ही जुडी मला मोडून दे.

मग एकएकानें मोठा नेट केला; परंतु जुडींतील काठ्या एकमेकांच्या आसऱ्यानें होत्या, त्या कोणाच्यानें मोडवल्या नाहींत.

नंतर झाताऱ्यानें तीच जुडी मोकळी करून तींतील एकएक काठी एकएकाच्या हातीं दिली, आणि पहिल्याप्रमाणें मोडावयास सांगितलें. मग त्या अवघ्या काठ्या त्यांनीं एका क्षणांत मोडून टाकिल्या.

तेव्हां बाप त्यांस झणाला, मुलांनो, पाहि-

लेंना हें एकीचें बळ? तुह्मी असेच मैत्रीनें एकमेकांचा आसरा करून रहाल, तर तुह्मांस उपद्रव करण्याविषयीं कोणाचें बळ चालणार नाहीं. तोच मैत्रीचा आसरा एक वेळ सुटला ह्मणजे मग कोणीही क्षण न लागतां तुह्मांस मारील.

## धडा १३.

### गांवढेकर आणि साप.

एका गांवढेकऱ्या कुणब्यानें थंडीच्या दिवसांत परसांत काम करीत असतां, वईपाशीं पडलेला एक साप पाहिला. तो थंडीच्या गारवठ्यानें फार व्याकूळ, घटकेनें मरणार, असें पाहून कुणब्यास दया आली.

मग त्या सापास त्या कुणब्यानें घरीं नेऊन विस्तवापाशीं ठेविलें. तेथें तो शेकानें दहा पांच पळांनीं हुशार झाल्यावर, उभा राहून, फूत्कार करून, कुणब्याच्या बायकामुलांच्या आंगावर उड्या टाकूं लागला; तेव्हां त्यांची दाणादाण झाली.

कुणबी परसांत होता तो ती आरडाआरड

ऐकतांच कुऱ्हाड हातीं घेऊन आला; त्यानें एका घायानें सापाचे दोन तुकडे केले.

घाय मारते वेळेस तो त्यास हे शब्द बोलला,— ' अरे दुष्टा, ज्यानें तुझा जीव वांचविला त्याचे उपकार असे फेडितोस काय? आतां तुला मरण योग्य आहे; परंतु, अरे दुष्टा, तुझ्या अपराधास नुसत्या मरणापेक्षां कांहीं अधिक पारिपत्य असावें.'

---

## धडा १४.

### दोन वाटसरू.

दोन वाटसरू संगतीनें चालले होते. त्यांतील एकास वाटेंत पडलेली रुपयांची बटवी सांपडली, ती हातीं घेऊन तो दुसऱ्यास ह्मणतो, रे, ही पहा मला रुपयांची बटवी सांपडली.

दुसरा त्यास उत्तर करितो, रे, 'मला' सांपडली, असें कां ह्मणतोस? 'आपणांस' सांपडली असें ह्मण. आपण उभयतां सोबती, ह्यासाठीं नफा किंवा तोटा जें काय होईल तें दोघांचेंच.


तें ऐकून बटवीवाला ह्मणतो, होय तर, मला सांपडलेल्या वस्तूचा भाग मी तुला कां देईन? दुसरा ह्मणाला, बरें तर, नको देऊं.

मग ते दोघे कांहींसे पुढें गेले, इतक्यांत बटवीचा धनी शोध लावून, सरकारचे शिपाई घेऊन त्यांच्या पाठीमागें त्यांस गांठित आला. त्यांस पाहून बटवीवाला सोबत्यास ह्मणतो, गड्या, आपण गोष्ट वाईट केली.

त्यास सोबती उत्तर करितो, आतां, 'आपण' गोष्ट वाईट केली, असें कां ह्मणतोस? 'म्यां' गोष्ट वाईट केली, असें ह्मण. जर तूं मला तुझ्या सुखाचा वांटा देतास तर मीही तुझ्या दुःखाचा वांटेकरी होतों.

## धडा १५.

### आकृति.




रामाच्या हातांत काठी आहे, ती सरळ आहे; तिला अगदीं वांक नाहीं. माझी छडी सरळच आहे, पण मध्यें थोडीशी वांकडी आहे.

गोपाळानें तुला तीरकमठा दिला आहे, त्याची दोरी सरळ आहे, पण कमठा वांकडा आहे. दोरी ओढिली ह्मणजे तीही वांकडी होते.

कृष्णाची पाटी चौकोनी आहे. तिला चार कोंपरे आहेत. तुझा रुमालही चौकोनी आहे.

शिंप्यानें आंगरखा शिवण्याकरितां कापड फाडिलें आहे, त्यांत कांहीं तुकडे चौकोनी आहेत, कांहीं तिकोनी आहेत.

चौकोनी आहेत त्यांना चार कोंपरे आहेत, आणि तिकोनी आहेत त्यांना तीन कोंपरे आहेत.

नारायणाच्या हातांतलें कडें वाटोळें आहे. ह्या पंचपात्रीचें तोंड वाटोळेंच नव्हे काय?

---

## धडा १६.

### वेडें कोंकरूं ( कल्पित गोष्ट ).

मागें एका धनगरापाशीं मेंढरें व कोंकरें पुष्कळ होतीं. तो त्यांचा फार चांगला सांभाळ करीत असे. त्यांस खावयास ताजें हिरवें गवत घालून स्वच्छ पाणी पाजीत असे. एखादें मेंढरूं दुखणाईत झालें तर त्याची तो निगा

चांगली राखी. आणि उंच डोंगरावर चढतांना कोंकरें थकलीं, तर तो त्यांस उचलून आपल्या बगलेंत घेऊन वर नेई.

मेंढरें व कोंकरें कुरणांत चरत असतां त्यांस रंजविण्यासाठीं संध्याकाळीं त्यानें पांवा वाजवावा, आणि त्यावर गाणें गावें. ह्याप्रमाणें तो त्यांचें लालनपालन करीत असे. त्याच्या मेंढरांप्रमाणें व कोंकरांप्रमाणें सुखी मेंढरें व कोंकरें कोठें नव्हतीं. परंतु नित्य रात्र झाली ह्मणजे तो धनगर आपल्या मेंढरांस व कोंकरांस मेंढवाड्यांत कोंडून ठेवीत असे.

मुलांनो, मेंढवाडा कसा असतो हें तुह्मांस ठाऊक असेलच. नसला तर मी सांगतों. रात्रीं मेंढरें रहावयाकरितां एक सपाट जागा पाहून तिच्या चोहों बाजूंस उंच कुंपण घालितात, आणि एका आंगानें लहानसें दार राखितात, त्याला मेंढवाडा ह्मणतात. रात्र झाली, अंधार पडला, थंडी पडली, ह्मणजे तो धनगर आपल्या मेंढरांस व कोंकरांस हाक मारून आणून, मेंढवाड्यांत घालून, दार बंद करी. तेथें त्यांस थंडी, वारा

ह्यांचा उपद्रव होत नसे. तीं सुखानें पडून झोंप घेत. त्यांला दुःख देण्यास आंत कोणाच्यानें जाववत नसे. त्यांची राखण करण्याकरितां धनगराचे कुत्रे बाहेर जागत वसत. कोणी आला तर त्यावर ते भुंकत.

उजाडलें ह्मणजे धनगर त्या वाड्याचें दार उघडी. मग सगळीं मेंढरें व कोंकरें बाहेर पडून कुरणांत चरावयास जात. ह्याप्रमाणें सगळीं मेंढरें व कोंकरें आनंदानें राहत असत, आणि आपल्या धन्यावर फार ममता करीत. पण त्यांत एक लहान अविचारी वेडें कोंकरूं होतें, त्यास तें बरें वाटत नसे.

---

## धडा १७.

### वेडें कोंकरूं कल्पित गोष्ट ( पुढें चालू ).

एके दिवशीं तें वेडें कोंकरूं आपल्या आईपाशीं येऊन ह्मणालें, कायगे आई, आमचा धनी आह्मांस रोज रोज रात्रीं कोंडून ठेवितो हें काय? ह्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तो कुत्र्यांस कोंडित नाहीं; मग आह्मांलाच कां कोंडितो? हा आह्मांवर त्याचा जुलूम आहे,

असें मला वाटतें. मीं खचीत बेत केला आहे कीं, सवड सांपडली तर वाड्यांतून पळून जावें; कांकीं मनास येईल तिकडे फिरावें हें मला बरें वाटतें. चांदण्या रात्रीस रानांत फिरण्याची मोठी मौज आहे.

त्या कोंकराची आई ह्मातारी मेंढी शहाणी होती, ती त्याला ह्मणाली, माझ्या लहान्या, तूं अगदीं वेडें आहेस; तुला समजत नाहीं. वाड्यांत रहावें हेंच तुला बरें आहे. आपला पाळणारा धनगर आपणांवर इतकी दया करितो, तर आपण त्याचें ऐकिलें पाहिजे. तूं रात्रीचें एकटें फिरूं लागलेंस तर खचीत तुझा कांहीं तरी घात होईल.

तें लहान कोंकरूं ह्मणालें, तूं ह्मण, पण मला तसें वाटत नाहीं. मग त्याच दिवशीं संध्याकाळीं जेव्हां धनगरानें मेंढवाड्यांत जाण्यासाठीं सर्वांस बोलाविलें, तेव्हां तें वेडें कोंकरूं सर्वांबरोबर आलें नाहीं. तें एका वईच्या खालीं हळूच जाऊन लपून राहिलें. वरकड मेंढरें व कोंकरें मेंढवाड्यांत जाऊन स्वस्थपणें

झोंपीं गेल्यावर हें वेडें कोंकरूं बाहेर पडलें, आणि नाचत, बागडत, इकडे तिकडे हिंडूं लागलें.

मग कुरणांत कांहीं वेळ फिरून तें रानांत शिरलें. तेथें कांहीं वेळानें एक मोठी भयंकर लांडगी अकस्मात दरींतून बाहेर येऊन मोठ्यानें ओरडूं लागली. तेव्हां त्या लांडगीला पाहून आणि तिचा भयंकर शब्द ऐकून, त्या वेड्या कोंकराची गाळण झाली. आणि आपल्या स्वच्छंदपणाचा पस्तावा होऊन त्यास वाटलें कीं, धनगरानें सर्वांबरोबर मला मेंढवाड्यांत कोंडून ठेविलें असतें तर बरें झालें असतें. पण मेंढवाडा एथून लांब राहिला, आतां कसें करावें? अशा चिंतेंत तें आहे इतक्यांत त्या लांडगीची, दृष्टि त्यावर गेली. तोंच तिनें येऊन कोंकरूं तोंडांत धरून आपल्या दरींत नेलें, आणि आपल्या पिलांस खावयास दिलें.

त्या कोंकरानें त्या भल्या धनगराचें मानिलें असतें, व ह्यातार्‍या शहाण्या आईचें ऐकिलें असतें, तर त्याचा असा घात झाला नसता. ह्यासाठीं, मुलांनो, तुह्मी आपल्या आईबापांचें

व वाडवडिलांचें ऐकत जा, ह्मणजे तुह्मांस सुख होईल; आणि जर तुह्मी आपलाच हेका धरून बसाल तर कदाचित् तुह्मांला मोठें दुःख प्राप्त होईल.

---

## धडा १८.

### आरसा पाहणारीं भावंडें.

एका पुरुषास दोन लहान मुलें होतीं, एक मुलगा आणि एक मुलगी. मुलगा होता तो रूपानें फार सुंदर होता, मुलगी साधारण होती.

एके दिवशीं तीं उभयतां मुलें आरशापाशीं खेळत असतां मुलगा मुलीस ह्मणतो, अगे, ह्या आरशांत आपण पाहूं बरें सुंदर कोण दिसतें तें. मुलीस तें वाईट वाटलें. तिला समजलें कीं, ह्यानें हें आपल्याला हिणवावयासाठीं ह्मटलें.

मग तिनें बापाजवळ जाऊन भावाचें गाऱ्हाणें सांगितलें. ती ह्मणाली, बाबा, आरशांत रूप पाहून समाधान पावावें हें बायकांचें काम, त्यांत पुरुषानें मन घालूं नये.

बापानें दोघांस पोटाशीं धरून त्यांचें समाधान केलें. तो ह्मणाला, मुलांनो, तुह्मी भांडूं

नका. आजपासून तुह्मी दोघेंही नित्य आरशांत पाहत जा. मुला, तूं ह्याजकरितां पहा कीं, तुझ्या ह्या अशा सुंदर तोंडास दुर्गुणाचा मळ लागला तर तो तुला समजावा; आणि मुली, तूं ह्याजकरितां पहा कीं तुझ्या रूपांत जें उणें आहे तें तुझ्या चांगल्या गुणांनीं पुरतें झालें कीं नाहीं हें तुला समजावें.

तात्पर्य.

विचारानें पाहिलें असतां ह्या जगांत कोणत्याही वस्तूंत उणेपणा नाहीं असें नाहीं. ह्यासाठीं बुद्धीचा आरसा करून त्यांत आपले गुण, अवगुण नित्य पाहत गेलें असतां मोठें हित आहे.

---

### धडा १९.

### शेतकरी आणि त्याचा कुत्रा.

एक शेतकरी मुलास पाळण्यांत निजवून, जवळ कुत्र्यास बसवून, पाव घटकेचें काम होतें ह्मणून शेतास गेला.

काम झाल्यावर तो माघारा येऊन पाहतो तों मुलाचा पाळणा पालथा पडला आहे, आणि त्यांतील चिरगुटें फाटून रक्तानें भरलीं आहेत.

जवळ कुत्रा निजला होता, त्याजकडे पाहिलें तों त्याचें तोंड व आंग हीं रक्तानें भरलीं आहेत. असें पाहतांच शेतकऱ्याच्या मनांत आलें कीं, कुत्र्यानें मूल मारिलें.

त्या वेळेस त्याला जो राग आला त्याच्या झपाट्यासरशीं हातांत कुऱ्हाड होती ती कुत्र्याच्या डोकीवर घालून त्यानें त्याचा प्राण घेतला; नंतर पाळणा उलथा करून पहातो तों मुलास कांहीं धक्का नाहीं, मूल जिवंत आहे. जवळ एक साप मात्र कुत्र्यानें तोडल्यामुळें मरून पडलेला दृष्टीस पडला.

मग त्यास समजलें कीं, मुलाचा प्राण कुत्र्यानें राखिला. तेव्हां शेतकऱ्यास मोठा पश्चात्ताप होऊन तो ह्मणाला, हाय! हाय! म्यां दुष्टानें काय वाईट काम केलें हें! ज्यानें मुलाचा जीव राखिला त्याचा जीव विचार न करितां म्यां व्यर्थ घेतला! हा मजकडून मोठा अन्याय झाला.

तात्पर्य.

रागाचा आवेश येतो तेव्हां लागलेंच एखाद्या कामास लागूं नये. रागाची शांति

राची आज्ञा ऐकिली पाहिजे, ज्यानें आपणांस उत्पन्न केलें, आणि जो नेहमीं आपणांस संभाळितो.

मू०—हो हो बाबा, खरी गोष्ट! माझ्या ध्यानांतच नाहीं. आतां ही गोष्ट आजपासून मी पक्की ध्यानांत ठेवीन.

## धडा २३.

### बहीण आणि भाऊ.

**बहीण.**—भाऊ, तुला मी काल आरसा देत नव्हतें, तो तूं माझ्या हाताला झोंबून बळेंच घेतला, आणि खालीं पाडिला. माझा आरसा तूं फोडिला. आतां तुला मी आपली बाहुली देणार नाहीं. तूं मोडशील एखादी.

**भाऊ.**—मीं का बळें आरसा फोडिला, गे ताई? पाहत होतों तों हातांतून खालीं पडला, आणि फुटला, त्याला मीं काय करावें? आरसा काचेचा होता ह्मणून फुटला. बाहुली चिरगुटाची आहे, ती कशानें मोडणार आहे? मी पाहून लागलीच तुझी तुला देईन.

**ब०**—माझी बाहुली चिरगुटाची असो किंवा कशाची असो, ती मी तुला देणार नाहीं.

गड्या, तूं माझ्या हाताला झोंबूं नको. झोंबलास तर मी आईला सांगेन. तूं दूर हो, भाऊ, मला बाहुलीला परकर नेसवूं दे.

भा०—जा, नाहीं देत तर नाहीं. ही काय दीड दमडीची बाहुली! बैस घेऊन आपली. मला बाबानें एक छानदार इंग्रजी बाजा दिला आहे तो कोठें तूं पाहिला आहे? अशा शंभर बाहुल्या त्याजवरून ओंवाळून टाकाव्या! तो बाजा मी तुला दाखविणार देखील नाहीं. वाहवा, काय बाजा मौजेचा! मी आतां माडीवर जाऊन बाजा वाजवीत बसतों.

ब०—वाजीव, काय पाहिजे तें कर; मला तुझा बाजा नको. माझी दीड दमडीची बाहुलीच मला पुरे. तुझा बाजा कसा आहे तो मीं पाहिला आहे. काय मेला तो हिडीस!

भा०—तूं केव्हां गे पाहिला, ताई? बाबानें तो मला दिल्यापासून मीं आपल्या खिडकींत ठेविला आहे. तो मीं एकदा शेजाऱ्याच्या विठूस दाखविण्याकरितां मात्र काढिला होता; पण त्या वेळेस तूं आईबरोबर बाहेर गेली होतीस.

ब०—बाबानें तो आणिला त्या दिवशींच मीं पाहिला. तो मला आवडता तर बाबानें अगोदर तो मलाच दिला असता. मीं बाबाला ह्मटलें, बाजापेक्षां मला बाहुली आवडते, ह्मणून बाबानें मला ही बाहुली दिली. आतां मी आपल्या बाहुलीचें लगीन करणार आहें.

भा०—बरें तर ताई, तुझ्या बाहुलीचें लगीन होऊं लागलें ह्मणजे मी आपला बाजा वाजवीन. मग तर तुझा राग मजवरचा जाईल ना?

ब०—राग कशाचा भाऊ; तूं सोईनें मजबरोबर खेळलास, तर किती मौज होईल बरें, पण तूं ज्या त्या गोष्टीचा हट्ट घेऊन बसतोस! तें मला आवडत नाहीं.

भा०—बरें तर, आजपासून मी सोईनें वागेन; आणि तूं सांगशील तसें करीन. पण ताई, आरशाची गोष्ट आईला समजली तर आई रागें भरेल त्याचें कसें करावें?

ब०—तूं भिऊं नको, मी तें तुजवर येऊं देणार नाहीं.

## धडा २४.

### परशुराम आणि कृष्णी.

उन्हाळ्यांत एके दिवशीं गोपाळरावांनीं आपलीं दोन मुलें परशुराम आणि कृष्णी, ह्यांना कबूल केलें होतें कीं, मी तुह्मांस आज संध्याकाळीं आपल्याबरोबर एक चांगला बाग पहावयास नेईन. मग संध्याकाळ झाला तेव्हां ते माडीवर पोशाक करावयास गेले; मुलें खालीं होतीं.

परशुरामास आतां आपल्या दृष्टीस मोठी मौज पडेल ह्मणून जो आनंद झाला तो पोटांत मावेना. तो नाचूं उडूं लागला. इकडून तिकडे तिकडून इकडे धूम खेपा घालीत आहे, इतक्यांत असें झालें कीं, तेथें एक फुलझाडाची कुंडी बापानें ठेविली होती, त्या झाडाच्या फुलास त्याच्या शेल्याचा झपाटा लागून तें डांगळीपासून तुटून पडलें. तें हातांत घेऊन कृष्णी त्यास ह्मणते, अगा भाऊ, हें त्वां काय केलें?

तिच्या हातांत फूल आहे इतक्यांत गोपा-

ळराव वरून खालीं आले. त्यांनीं रागें भरून कृष्णीस ह्मटलें, अगे मुली, मीं इतकें जपून फूल राखून ठेविलें होतें, तें त्वां असें तोडावें ना? ती कांपत कांपत ह्मणाली, माझ्या बाबा, तूं कृपा करून मजवर रागावूं नको!

गोपाळराव अमळ थंड होऊन ह्मणाले, मुली, मी रागें नाहीं भरलों; पण आतां आपण दुसऱ्याच्या बागांत जाणार, तेथेंही तुला फुलें तोडावयाची अशीच इच्छा होईल, ह्मणून मी तुला बाहेर नेत नाहीं; ह्याविषयीं तुला वाईट वाटूं नये.

कृष्णी खालीं मान घालून मुकाट्यानें उभी राहिली. तें पाहून परशुरामाच्यानें उगीच राहवलें नाहीं. तो डोळ्यांत आसवें आणून बापापाशीं जाऊन ह्मणाला, बाबा, तो माझ्या ताईचा अन्याय नव्हे; तें फूल मींच मोडलें; ह्मणून मला घरीं ठेव, आणि ताईस बरोबर ने.

तीं मुलें अशीं नीतिवंत पाहून आणि त्यांची परस्परांविषयीं ममता पाहून, गोपाळरावजींस गहिंवर आला. त्यांनीं त्यांस पोटाशीं धरिलें.

ते ह्मणाले, तुह्मी दोघेंही माझीं आवडतीं; दोघेंही माझ्याबरोबर चला.

मग परशुरामास आणि कृष्णीस जो आनंद झाला तो काय सांगावा! तीं बापाबरोबर बागांत गेलीं. त्यांत त्यांनीं नाना प्रकारचीं झाडें पाहिलीं. तेथें परशुराम आणि कृष्णी आपापलीं चिरगुटें आटोपून बागांतून चालत आहेत हें पाहून गोपाळरावजींस मोठें समाधान वाटलें. त्यांचें जें फूल त्यांनीं नासलें तें असतें तर त्यापासून त्यांना आनंद झाला असता खरा; परंतु त्या वेळेस त्या बहीणभावांमध्यें परस्परप्रीति व त्यांचें शहाणपण पाहून त्यांस त्याहून हजारपट आनंद झाला.

---

## धडा २५.

### वारा पाऊस.

उन्हाळ्यांत गार वारा आला ह्मणजे मोठा आनंद होतो. पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत गार वारा सुटला तर तो आंगास झोंबतो. मोठा वारा सुटला ह्मणजे धुळीनें सर्व दिशा धुंद होतात, आणि कांहीं दिसेनासें होतें.

अशा वाऱ्यांत छत्री उघडून चालण्याचा इलाज नसतो; व वाळूंतून चाललें असतां खडे सटासट पायांवर येऊन बसतात व कण डोळ्यांत शिरतात. मोठ्या वाऱ्यानें झाडें देखील पडतात.

उन्हाळा संपला ह्मणजे पावसाळा लागतो. पावसाळा लागण्याच्या सुमारास बहुतकरून पावसांत गारा पडतात. गारा पडून जमिनीवर त्यांचा थर झाला ह्मणजे मोठी मौज दिसते.

पाऊस पडला ह्मणजे झाडांस टवटवी येते, व चहूंकडे जमिनीवर दाट गवत उगवतें, आणि सर्व धान्यें पिकतात. पाऊस पुष्कळ पडला ह्मणजे नद्यांस पूर येतात; तळीं, विहिरी पाण्यानें भरून जातात.

ज्या वर्षीं पाऊस पडत नाहीं त्या वर्षीं पाण्याचा दुष्काळ पडतो, व शेतें, गवतें उत्पन्न होत नाहींत, ह्यामुळें फार महागाई होते. पावसाळा लागण्याच्या सुमारास लोक घरें शाकारितात, आणि दाण्याची व सर्पणाची बेगमी करून ठेवितात, व शेतें नांगरितात.

---

## धडा २६.

### सोनें, रुपें आणि तांबें.

सर्व धातूंमध्यें सोनें उत्तम आहे. जमिनींत सोनें थोडें सांपडतें ह्मणून तें महाग विकतें. सोन्याचा रंग पिवळा असतो, आणि त्याच्या आंगीं चकाकी असते. सोनें फार जड व मऊ असतें. श्रीमंत लोक आंगावर घालण्याकरितां सोन्याचे दागिने करितात.

सोन्याचा पत्रा पाहिजे तितका पातळ करितां येतो, आणि त्याची तार पाहिजे तितकी बारीक करितां येते. सोन्याचा मुलामा दुसऱ्या धातूच्या भांड्यांवर करितात, तेणेंकरून तीं भांडीं सोन्यासारखीं दिसतात.

---

रुपें खाणींतून काढितात. रुप्याचा रंग पांढरा असतो. ह्याच्याही आंगीं चकाकी असते. ह्याचे रुपये पाडितात, दागिने करितात. श्रीमंत लोक ताटें, वाट्या, गडवे, पेले, तबकें, चौफुले, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, वगैरे भांडीं रुप्याचीं करितात. रुप्याची किंमत सोन्याच्या किमती-

पेक्षां फार कमी आहे. सोन्याप्रमाणें रुप्याचाही मुलामा होतो.

तांब्याच्या खाणी असतात. तांब्याचा रंग तांबूस असतो. ह्याला रुप्यापेक्षां नाद फार आहे. तांब्याच्या अंगीं चिवटपणा आहे. ह्याची तार पुष्कळ लांब काढिली तरी ती तुटत नाहीं. तांब्याचे मोठमोठे पत्रे करितात. तांब्याचीं पुष्कळ प्रकारचीं भांडीं करितात. घागरी, तपेलीं, पातेलीं, पराता, हांडे, वगैरे मोठीं भांडीं, आणि लोट्या, गडवे, पेले, पंचपात्र्या, पळ्या, ताह्मनें, वाट्या वगैरे लहान भांडीं करितात.

तांब्याच्या रसांत जस्त मिळविलें ह्मणजे पितळ होते. पितळेचा रंग पिवळा असतो. पितळेचींही नाना प्रकारचीं लहानमोठीं भांडीं करितात. नासिक, झाशी आणि काशी एथें पितळेचीं भांडीं फार सुरेख करितात.

पितळेवर व तांब्यावर जो कळंक येतो तो केवळ विष आहे. तो कळंक हिरवा असतो, त्याचा हिरवा रंग करितात. जंगला आणि मोरचूत हे तांब्याचे कळंक आहेत.

## धडा २७.

## पोपट.



हें चित्र पोपटाचें आहे. पोपट हें फार देखणें पांखरूं आहे. ह्याचा रंग बहुतकरून हिरवा असतो. ह्याचा पिसारा फार सुंदर असतो. बहुतकरून उष्ण देशांत पोपट असतात, थंड देशांत नसतात. ह्या हिंदुस्तान देशांत तर पोपट पुष्कळच आहेत. ते कळप करून फिरतात. ते झाडांच्या ढोलींत किंवा उंच भिंतींच्या भोंकांत आपलीं घरटीं करितात, आणि त्यांत आपलीं अंडीं घालितात.

पोपटाच्या जाती अनेक आहेत. त्यांत कितीएक पोपट मोठे असतात, व कितीएक लहान असतात.

पुष्कळ लोक पोपट धरून पिंजऱ्यांत पाळितात. पोपटास बोलावयास शिकविलें असतां त्यास बोलतां येतें. पण जितके शब्द शिकवावे तितके शब्द मात्र तो बोलतो, आणि तो जे शब्द बोलतो त्यांचा अर्थ त्यास समजत नाहीं.

पोपटाचे पाय झाडाची डाहाळी धरावयाच्या सोईचे देवानें केले आहेत, त्याच्या पायांस दोन बोटें पुढें व दोन बोटें मागें अशीं असतात. दुसऱ्या पांखरांच्या पायांस तीन बोटें पुढें व एक बोट मागें अशीं असतात. पोपटाची चोंच बांकदार असून बळकट असते, आणि तिच्या शेवटास सुरीप्रमाणें धार असते, ह्यामुळें जाड कवटीचीं फळें त्याला सहज फोडितां येतात. पोपटाचें खाणें ह्मटलें ह्मणजे झाडांचीं फळें आणि शेतांतील धान्यें हें होय.

कांहीं मुलें पोपटासारखीं असतात. ह्मणजे तीं आंपले धडे तोंडपाठ करितात पण त्यांचा अर्थ त्यांस समजत नाहीं. अशा विद्येला पोपटविद्या ह्मणतात. तर मुलांनो, तुह्मी पोपटासारखे होऊं नका.

## धडा २८.

## कोंबडा.



हें चित्र कोंबड्याचें आहे. ह्या पांखराच्या आंगीं धीटपणा, बळकटी, आणि देखणेपणा हे गुण मोठे आहेत. ह्याच्या डोक्यावर तांबडी शेंडी असते, आणि चोंचेखालीं दोन कल्ले असतात. ह्याची चोंच फार मजबूद असते, ह्याच्या पायाला आंतल्या बाजूस एकेक नखी असते. त्या नखीनें हा दुसऱ्या कोंबड्यास मारितो. ह्याला दुसऱ्या कोंबड्याबरोबर झुंजण्याची फार हौस असते.

ह्याच्या शेंपटाचीं पिसें नेहमीं उभारलेलीं असतात. तीं पिसें कमानीसारखीं बांकदार असून त्यांचे शेंडे खालीं लोंबत असतात, त्यामुळें

तीं फार सुंदर दिसतात. शेंपटाचीं पिसें तांबडीं, हिरवीं, आणि निळीं असतात.

मोठ्या पहांटेस कोंबडा शब्द करितो. त्या शब्दास कोंबड्याची आरवणी किंवा साद ह्मणतात. त्याची आरवणी किंवा साद ऐकून उद्योगी लोक आंथरुणावरून उठतात.

हें पांखरूं पुष्कळ लोक पाळितात. पुष्कळ लोक ह्याची सागुती व अंडीं खातात. कोंबडीची आपल्या पिलांवर ममता फार असते. घार किंवा दुसरें मोठें पांखरूं जवळ आलेलें पाहिलें ह्मणजे ती पिलांस आपल्या पंखांखालीं झांकून घेते.

दुसऱ्या पांखरांप्रमाणें ह्या पांखरास आकाशांत लांबवर उडवत नाहीं. ह्याचें आंग जड असतें. हें फार तर जमिनीवरून उडून घरावर जाऊन बसतें. कोंबडी दरखेपेस वीसपर्यंत अंडीं घालिते. एका कोंबडीपासून एका वर्षांत पन्नास पाउणशें कोंबडीं उत्पन्न होतात. कोंबड्यांमध्यें एक नर एक मादी असे जोडे नसतात. दहा वीस कोंबड्या असल्या तर त्यांत एखाद दुसरा कोंबडा असतो.

## धडा २९.

### सकाळ, संध्याकाळ आणि दिशा.

सूर्य उगवण्याची जी वेळ तीस सकाळ ह्मणतात. आणि सूर्य मावळण्याची जी वेळ तीस संध्याकाळ ह्मणतात. सूर्य सकाळीं उगवतो तेव्हां तो कोठें असतो? पूर्वेस असतो. तो संध्याकाळीं मावळतो तेव्हां कोठें असतो? पश्चिमेस असतो.

आपण पूर्व दिशेकडे तोंड केलें ह्मणजे आपल्या पाठीकडे पश्चिम दिशा असते, उजव्या हाताकडे दक्षिण दिशा असते, आणि डाव्या हाताकडे उत्तर दिशा असते.

पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर ह्या चार मुख्य दिशा आहेत. ह्या चार दिशा समजल्या ह्मणजे नकाशा पाहण्यास फार सोपें पडतें. हिंदुस्तानाच्या नकाशांत पुणें पहा; त्याच्या पूर्वेस हैदराबाद आहे, पश्चिमेस मुंबई आहे, दक्षिणेस सातारा आहे, आणि उत्तरेस नगर आहे, असें दिसेल.


ह्या दिशा समजल्या ह्मणजे वारा कोणत्या दिशेस वाहतो त्या दिशेचें नांव घेऊन सांगतां येतें. कापूस किंवा दुसरा कांहीं हलका पदार्थ

वाऱ्यावर फेंकून दिला, तर ज्या दिशेस वारा वाहत असतो त्या दिशेस तो जातो. ह्यावरून वारा कोणत्या दिशेस वाहत आहे हें समजतें.

आतां ह्या वेळेस पहा, सूर्य पश्चिमेस आहे, तो लवकर दिसेनासा होईल. आपल्या खालच्या अंगास, ह्मणजे भूगोलाच्या दुसऱ्या बाजूवर, जे लोक आहेत त्यांस आतां उजाडेल. पहा, सूर्य खालीं चालला. आतां तर अगदींच दिसेनासा झाला. आतां तो उद्यां सकाळीं पूर्वेकडे उगवेल तेव्हां दिसेल. तोंपर्यंत कांहीं दिसणार नाहीं.

## धडा ३०.

## तंबू.



प्रवासी लोकांस तंबूचा मोठा उपयोग आहे. तंबू पुष्कळ प्रकारचे असतात. कितीएकांस मध्यें एकच खांब असतो, जसा वरील चित्रांत आहे. त्या-

स एकखांबी तंबू ह्मणतात. कितीएकांस दोन खांब असतात, त्यांस दुखांबी तंबू ह्मणतात. तंबू फार मोठा असला ह्मणजे त्यास डेरा असेंही ह्मणतात.

तंबूच्या वरच्या भागास टप असें ह्मणतात, आणि खालच्या भागास कनात ह्मणतात. ही कनात सभोंवतीं लावितात. टप एकेरी किंवा दुहेरी (ह्मणजे एकावर एक) असतें. टप दुहेरी असलें तर कनातही दुहेरी असते. दुहेरी तंबूंत वरून अथवा बाजूनें ऊन, थंडी, किंवा पाऊस ह्यांची फारशी बाधा होत नाहीं.

जेव्हां राजे लोक स्वारीस किंवा शिकारीस निघतात, अथवा सरकारी कामदार लोक सरकारी कामाकरितां बाहेर फिरावयास निघतात, तेव्हां त्यांस रहावयास तंबू अवश्य लागतात. तंबूंशिवाय त्यांचें चालतच नाहीं. तंबू हें कापडाचें घरच आहे. हें घर बहुतकरून जेथें पाहिजे तेथें थोड्याशा कष्टानें नेतां येतें, व उभें करितां येतें. आणि जसा खर्च करावा तशा त्यामध्यें सोई करितां येतात. श्रीमंत लोक शोभेकरितां तंबूस आंतून किनखा-बानें, किंवा सखलादीनें, अथवा मश्रूनें मढवितात.

तंबूची दुसरी एक लहान जात असते तिला राहुटी ह्मणतात. राहुटीहून लहान एक प्रकार आहे त्यास पाल ह्मणतात. राहुटी किंवा पाल चाकर माणसांच्या किंवा गरीब लोकांच्या राहण्याच्या उपयोगीं आहे.

हल्लीं जबलपूर एथील उद्योगशाळेंत सर्व प्रकारचे तंबू तयार करितात.

## धडा ३१.

### पारा, लोखंड आणि कथील.

पारा खाणींतून काढितात. पाऱ्याचा रंग पांढरा असतो. पारा पातळ असतो, तरी त्याला हात लाविला असतां तो हातास चिकटत नाहीं. तो जमिनीवर पडला असतां फुटून त्याच्या लहान लहान गोळ्या होतात.

पाऱ्यांत कथील मिसळून तो भिंगाच्या एका आंगास लाविला ह्मणजे आरसा होतो, व त्यांत पाहणाऱ्याचें तोंड दिसतें.

लोखंडाचे दगड खाण तून काढितात. ते भट्टींत घालून भाजले ह्मणजे त्यांपासून लोखंड निघतें. लोखंड फार कठीण असतें, व त्याचा रंग

काळा असतो, दुसऱ्या धातूंपेक्षां लोखंड फार स्वस्त असतें. आणि लोखंडाचा उपयोग फार कामांत होतो.

नांगराचे फाळ, कुदळी, कुऱ्हाडी, कोयते, विळे, पायळे, तरवारी, सुऱ्या, खिळे, कड्या, कोंयडे, पहारा, सांखळदंड वगैरे पुष्कळ पदार्थ लोखंडाचे करितात. लोखंडाचे मोठमोठे पत्रे करितात. त्या पत्र्यांचीं कितीएक प्रकारचीं भांडीं करितात.

लोखंडाचेंच कांहीं कृतीनें पोलाद होतें. पोलाद लोखंडापेक्षांही कठीण असतें. चाकू, कातऱ्या, सुऱ्या, तरवारी वगैरे नाना प्रकारचीं उंची हत्यारें व शस्त्रें पोलादाचींच करितात.

कथील खाणींत सांपडतें. कथील रुप्यासारखें पांढरें व चकचकीत दिसतें. पण हें त्यापेक्षां फार हलकें आणि मऊ असतें. हें विस्तवाजवळ ठेविलें असतां तेव्हांच वितळावयास लागतें.

कथलाचीं भांडीं करितात. कथलाच्या भांड्यांत आंबट पदार्थ कळंकत नाहीं. म्हणून दहीं, ताक वगैरे आंबट पदार्थ कथलाच्या भांड्यांत ठेवितात. तांब्याच्या व पितळेच्या

मास, व रब्बीच्या कापणीचा हंगाम माघमास.

## धडा ३४.

### गोगलगाय.

बागेमध्यें झाडांखालून बहुत मुलांनीं गोगलगाई पाहिल्या असतील. गोगलगाय शंखासारख्या घरांत असते. तें घर नेहमीं तिच्या पाठीवर चिकटलेलें असतें. पाहिजे तेव्हां ती आपलें आंग आटोपून आपल्या घरांत शिरते, आणि पाहिजे तेव्हां आंग बाहेर काढून चालूं लागते. जेव्हां चालत असते तेव्हां तिचें घर तिच्या पाठीवरच असतें.

गोगलगाईच्या डोक्यावर चार शिंगें असतात. त्यांपैकीं वरल्या दोन शिंगांच्या टोंकांस डोळे असतात, आणि खालचीं दोन शिंगें पुढें आलेला पदार्थ चांचपून ओळखण्याच्या उपयोगीं पडतात. हीं शिंगें सर्वदा बाहेर असतात असें नाहीं. पाहिजे तेव्हां ती तीं बाहेर उभारते, आणि पाहिजे तेव्हां आंत आटोपून घेते. झाडाचा पाला हें तिचें खाणें आहे.

गोगलगाय चालूं लागली ह्मणजे तिच्या आंगांतील एक प्रकारचा चिकट पदार्थ भुईला लाग-

त जातो. ह्यामुळें तिला जरी पाय नाहींत तरी ती भिंतीवर, झाडावर, किंवा अवघड ठिकाणीं चढत असतां निसरून खालीं पडत नाहीं.

हिंवाळ्याच्या दिवसांत फार थंडी पडली असतां गोगलगाय एखाद्या बिळांत किंवा भोंकांत जाऊन राहते. उन्हाळा आला ह्मणजे फिरून बाहेर निघते. पावसाळ्यांत गोगलगाई पुष्कळ उत्पन्न होतात.

एका जातीची गोगलगाय आहे ती कांहीं देशांतील लोक खातात; व कांहीं रोगांवर तिचें मांस औषधासारखें कामीं पडतें.

---

## धडा ३५.

## स्वच्छपणा.

प्रकृति चांगली असो किंवा बिघडलेली असो, पण मुलांनीं निर्मळ असावें. आपलें सर्व आंग धुऊन पुसून चांगलें स्वच्छ राखावें. कधीं ओंगळ किंवा मळकट असूं देऊं नये. ओंगळ मुलाकडे पाहिलें तर मनाला चिळस येते, मग त्याला जवळ घेण्याची गोष्ट कशाला पाहिजे?

मुलांनीं सकाळीं उठून अगोदर आपलें तोंड धुवावें, व दांत घांसावे, ह्मणजे तोंडाला

घाण येत नाहीं. मग आपला स्वच्छ आंगरखा व टोपी घालून शाळेंत जावें. शाळेंत गेल्यावर त्यांनीं आपलीं चिरगुटें धुरळ्यांत मळवूं नयेत.

मुलांच्या स्वच्छपणाविषयीं त्यांच्या आईबापां-नींही सर्वदा लक्ष्य ठेविलें पाहिजे. आईबापांनीं आपलीं मुलें लहानपणीं चांगलीं निर्मळ ठेवावीं. त्यांस वेळच्यावेळेस स्वच्छ आंगरखा, स्वच्छ टोपी, घालावयास द्यावी. रात्रीस निजावयाचीं मुलांचीं पांघरणें वरचेवर धुऊन स्वच्छ ठेवावीं. असें केल्यानें मुलें निरोगी आणि बळकट अशीं होतात. आणि त्यांस फारसें दुखणेंबाणें येत नाहीं. तीं खुशाल मौजेनें हिकडे तिकडे हिंड-तात, खेळतात, आनंद करितात. मुलें लहान-पणापासून घामट होऊं दिलीं, किंवा त्यांच्या आंगावर ओंगळ मळकट चिरगुटें घातलीं, तर तीं रोगी आणि किरकिरीं अशीं होतात.

मुलांचीं चिरगुटें फाटकीं नसावीं. आई-बापें गरीब असलीं तरी त्यांनीं मुलांच्या फाटले-ल्या चिरगुटांस ठिगळें लावावीं, आणि वरचेवर धुऊन स्वच्छ राखावीं, फार मळूं देऊं नयेत,

ह्मणजे झालें. मग तीं नवीं नसलीं तरी चिंता नाहीं. स्वच्छपणा आरोग्य आणि शोभा ह्या दोन गोष्टींना कारण आहे.

---

## धडा ३६.

### खार.



खार हें मोठें चपळ जनावर आहे. हें वर मोठ्याशा उंदराएवढें असतें. हलक्या आंगाची व जलद धांवणारी असते. झाडाच्या बुंध्यापासून वरतीं डाहाळ्यांच्या शेंड्यां-पर्यंत एकसारखी धांवत चढते. ह्या झाडावरून त्या झाडावर सहज उडी मारून जाते. ही भुईवर फार करून चालत नाहीं. झाडावर, भिंतीवर, किंवा घरावर फिरत असते.

हिची एक जात भुईत बिळें करून त्यांत राहते. दुसऱ्या जातीच्या खारी झाडांच्या दुबेळक्यांत घरें करितात. तीं घरें पानें, काटक्या ह्यांनीं केलेलीं फार मजबूद असतात. ह्या घरांला

वरतीं मात्र एक दार असतें. आणि आंत पाऊस न जावा ह्मणून दार मोकळें राखून वरतीं एक तिरपी ताटी केलेली असते.


खारी आपलें खाणें मिळवून झाडाच्या ढोलींत सांठवून ठेवितात, आणि जोंपर्यंत खाणें बाहेर मिळत आहे तोंपर्यंत त्याला हात लावीत नाहींत. फळें, बिया, किंवा धान्य हें खाणें बाहेर मिळेनासें झालें ह्मणजे आपल्या सांठ्याला त्या हात लावितात. ह्या प्राण्याला बहुतेक झाडांचीं फळें आवडतात.

खारीचे दांत सुळ्यासारखे अणीदार असतात, ह्मणून बदाम वगैरे कठीण कवटीचीं फळें तिला सहज फोडून खातां येतात. हिचें आंग मऊ असतें. हिची शेपटी मोठी व लांब असून नेहमीं उभारलेली व पिंजारलेली असते, ह्यामुळें ती तिला शोभा देते.

हिचे कान घोड्याच्या कानांसारखे उभे असतात. ही वानरासारखी ढुंगणावर बसून हातांनीं खाणें उचलून खाते. उत्तरेकडील देशांत हिंवाळ्यामध्यें खारींचे भुरे केस जाऊन पांढरे येतात. खार लवकर माणसाळते.

## धडा ३७.

### ससा.



ससा हें गोजिरवाणें जंगली जनावर आहे. हें चार आणि दाणा खातें. सशांला रहावयास सुकी जागा पाहिजे, ह्मणून हे झाडींत किंवा शेतांत, जेथें माती भुसभुशीत असते, तेथें बिळें करून त्यांत राहतात.

कुत्रीं व रानांतील श्वापदें सशांला मारितात. ह्यांला बहुत शत्रु असतां ह्यांच्या आंगीं लढण्याची शक्ति कांहींच नसते. पण देवानें ह्यांना लांब कान व उंच डोळे देऊन ह्यांनीं दुरून लवकर ऐकावें व पहावें असें केलें आहे. हा प्राणी फार भित्रा आहे.

हा भयामुळें सदा सावध असतो. आणि कांहीं भयाचें कारण पाहिलें ह्मणजे लागलाच पळून जातो.

उत्तर देशांत थंडीच्या दिवसांमध्यें कितीएक जनावरांचे भुऱ्या, काळ्या, व उदी रंगाचे केस जाऊन त्यांस पांढऱ्या रंगाचे केस येतात, तसे सशांसही येतात. ससा हें जनावर मांजराएवढें असतें.

कितीएक लोक सशाला धरून घरीं बाळगितात. एका गृहस्थापाशीं बाळगलेला ससा होता. तो त्या गृहस्थाच्या इतका सवईचा झाला होता कीं, तो त्याच्या खोलींत जाऊन खेळत असे. वारंवार त्या गृहस्थाच्या हातांतून तो मौजेनें कागद खालीं पाडी, व बहुत आर्जव दाखवी. पण जर कोणी परका मनुष्य आला तर भिऊन पळून आपल्या पिंजऱ्यांत जाऊन बसे.

---

## धडा ३८.

### माधवराव आणि गणू.

**मा०**—गणू, आंघोळीची वेळ झाली, अजून हांड्याखालीं जाळ कां रे नाहीं? पाणी तापावयासं नको काय?

ग०—पाणी फार तापलें आहे ह्मणून जाळ मीं काढून टाकिला.

मा०—बरें तर, मला आंघोळीला पाणी उसपून दे. गंगाळ कोठें आहे? आण.

ग०—गंगाळ कोठें आहे तें सांपडत नाहीं. पातेल्यांत पाणी उसपून देऊं का?

मा०—बरें बरें, कशांत तरी दे, पण गणू, पाणी कढत दिसतें. ह्याला विसाण पाहिजे, विहिरीचा पोहरा काढून आण लवकर.

ग०—कालपासून विहिरीचा दोर पुरेनासा झाला आहे. मग पोहरा सोडून पाणी कसें काढूं?

मा०—इतक्यांत विहिरीचें पाणी खालीं गेलें काय? नवा दोर आणिला पाहिजे. असो, घरांत थंड पाणी असेल तर विसाणासाठीं थोडें घेऊन ये, पण स्वयंपाक कोठवर आला ह्याचा घरांत शोध घे अगोदर.

ग०—स्वयंपाकास नुकता आरंभ झाला आहे. वरण भाजी झाली आहे; भाताचें अधण चुलीवर ठेविलें आहे; वैलावर कढी कढत आहे; आणि अजून भाकरी व्हावयाच्या आहेत.

मा०—आज जेवण लवकर मिळेलसें दिसत नाहीं. मग एव्हां स्नान करून तरी काय करावयाचें आहे? स्वयंपाकास अवकाश आहे तों हजामत तरी करून घ्यावी. गणू, एखादा न्हावी लवकर बोलाव.

ग०—न्हावी पाहिला. खुंटावर एकही न्हावी नाहीं.

मा०—न्हावी नाहीं का? बरें तर. उद्यांचें उद्यां, आतां आंघोळ करावी हेंच बरें.

---

## धडा ३९.

### * शब्द सोडलेला १.

तूं मजपेक्षां मोठा आहेस आणि मी तुजपेक्षां ........आहें. तुझी आणि माझी........कशी होईल? तुमचा घोडा पहिल्यानें ताजा लठ्ठ होता, पण आतां अगदीं........कशानें झाला? तूं घोड्या........बसून येशील किंवा गाडींत........ येशील? मला पायांनीं........शक्ति नाहीं, ह्मणून मी घोड्यावर किंवा गाडींत........येईन. झाड

---

* सूचना. ज्या ज्या ठिकाणीं शब्द न लिहितां जागा सोडिली आहे त्या त्या ठिकाणीं मुलांनीं आपल्या बुद्धीनें बरोबर शब्द लावावा.

घोडा लहान मुलांच्या वसण्यास........नाहीं. कागदाचा रंग पांढरा दिसतो, शाईचा........ दिसतो, झाडांचा........हिरवा दिसतो. माझे दोन अंगरखे होते, त्यांतून एक........फाटला आणि........अंगरखा हरवला. आतां मी आंगांत काय........? दहा तास........जेवण्याची वेळ........घरांत पानें मांडलीं........ लवकर ....आणि जेवावयास........तुह्मांस जो पदार्थ ........तो मागून घ्या. मनांत संकोच धरूं........ आजच्या दिवशीं पदार्थांची........आहे. कांहीं ....नाहीं. तुह्मीं लवकर यावें, पण उशीर करून ........आतां स्वस्थपणें भोजन....सभा भरण्यास अजून दोन घटकांचा........आहे. मंडळी येऊं ........कीं नाहीं हें मी पाहून येतों. तुह्मांस कागद मोठा पाहिजे....लहान पाहिजे? बोला. मला मोठा कागद पाहिजे,...... भारी किमतीचा नको. तुमच्या घरांत पुरुष, बायका, मुलें, मिळून माणसें ....आहेत? मी तुह्मांला हाक मारीन तेव्हां तुह्मी मला ओ....मग तुह्मी व मी बरोबर सभेस........

## धडा ४०.

### *शब्द सोडलेला २.

हें घर माझें आहे. तुझें........तूं लांब होतास ह्मणून माझी हाक तुला........आली नाहीं. ह्या घरांत मी एकटाच राहत नाहीं. पुष्कळ........ राहतात. ह्या लहान टोपलींत इतके आंबे कसे ........हा मुलगा नुकताच शाळेंत........आहे. ह्यास येऊं लागल्यास पुरता महिनाही........नाहीं. त्या मुलापेक्षां ह्या मुलीची बुद्धि........ आहे. ह्या मुलास नेहमीं खेळावयास........ह्याला आपला धडा पाठ करण्याची........अगदीं नाहीं. ह्यानें कालचा धडा अजून पाठ........नाहीं. चांगल्या मुलांना विद्येची........असते. मी सकाळचा घरींच........दुपारून बाहेर....त्याचें पुस्तक त्याला लवकर नेऊन....त्याचा खोळंबा........नको. ह्या मुलानें थोड्या दिवसांत अभ्यास चांगला.... मला नको ह्मणणार कोण?....माझा धनी आहेस काय?...पाहिजे तसें करीन. ह्या कोणाच्या मुली....? ह्यांस....बोलाविलें? ह्या मुली भल्या

* सूचना. मागल्या धड्याच्या खालीं जी सूचना लिहिली ती ह्या धड्यासही लागू आहे.

दिसतात. ह्यावरून ह्यांचा स्वभाव........असावा, ह्यांनीं थोड्या........अभ्यास पुष्कळ केला. तुला आमच्या घरीं येण्याचें........कोणतें? तूं मुकाट्यानें एथून निघून........ नाहीं तर तुला मारीन. त्या पोरांनीं पहा कसा गोंगाट........आहे तो. तूं लवकर पुढें........माझी वाट........नको. माझा आंबा मीं घेतला, तुझा....तूं घे. त्यानें माझ्या ........ आंबा आणिला होता, पण मीं तो घेतला नाहीं....माझ्या अगोदर निजलास, पण....तुझ्या आधीं उठलों. रामा, मोरू, विठू....घरास गेले. गोविंदा आणि कृष्णा........मला बोलाविलें आहे. तुमचा देश तुह्मांला आवडतो, तसा आमचा देश आह्मांला........

---

## धडा ४१.

### इटीदांडूचा खेळ.

विठू गोविंदास ह्मणतो. गोविंदा, नदीच्या पलीकडे वाळवंटाच्या मैदानांत इटीदांडू खेळावयासाठीं पुष्कळ मुलें गेलीं आहेत. मी तिकडे निघालों; तूं चलतोस ना?

गोविंद.—होय, पण आई घरांत नाहीं. तिला विचारल्याशिवाय कसें जावें? ती बाहेरून आली ह्मणजे तिला विचारून येईन. आईनें बाहेर जातांना मला बजावून सांगितलें आहे कीं, खबरदार, मी येई तोंपर्यंत घरांतून हालूं नको.

विठू.—तुझी आई केव्हां येईल कोण जाणे. ह्या वेळीं खेळ रंगांत आला असेल. आपण लवकर गेलों तरच मौज. मी तर मघांच गेलों असतों, पण तूं परवां बोलला होतास कीं, मला बरोबर घेऊन जा, ह्मणून मी तुला हाक मारावयास आलों. तुझी येण्याची मर्जी नसली तर मी जातों आपला.

गो०—अरे विठू, असें काय करितोस बरें? अरे, अमळ थांब, माझी आई लवकरच येईल.

वि०—तुझी आई कोठें गेली आहे?

गो०—माझ्या मावसबहिणीला बरें वाटत नाहीं, ह्मणून तिच्या समाचारास गेली आहे.

वि०—तर मग ती लवकर कशाची येते? तेथें ती चार घटका बसेल तेव्हां येईल, तर मग

तूं बैस, मी जातों. आजचा खेळ मौजेचा आहे, ह्मणून तुला चल ह्मणतों. पण,–

गो०–खेळ मौजेचा खरा. माझ्या मनांतून यावयाचें आहे; पण काय करावें! गुंतून पडलों रे. बाबा जरी घरीं असता तरी बरें होतें. त्याला विचारून आलों असतों; पण तो कालच गांवास गेला.

वि०–बरें आतां तुझ्या मनांत खेळायास यावयाचें असेल, तर असें कर. मी तुझें घर संभाळितों. तूं धांवत जाऊन आपल्या आईला विचारून ये. नाहीं तर तिलाच घेऊन ये.

गो०–हो, हो, ही युक्ति बरी आहे. तर तूं एथें दरवाज्याच्या तोंडींच बैस, मी आईला विचारून येतों. पण, अरे, मला, घरांतून हालूं नको, ह्मणून आईनें ताकीद केली आहे, आणि मींही करार केला आहे कीं, तूं येईस तोंपर्यंत मी घरांतून बाहेर जाणार नाहीं. तर ह्या गोष्टीस बाध येणार नाहीं काय? ह्यासाठीं मीं जावें त्यापेक्षां तूं जाशील तर बरें होईल.

वि०–इतकी खटपट करण्याची मला गरज

नाहीं. तुला हाक मारून मीं आपणावरचा शब्द टाळला. आतां पाहिजे तर ये, नाहीं तर नको येऊं. हा मी चाललों, पहा.

गो०—अरे विठू, तूं माझा गडी असतां मला गरज नाहीं ह्मणतोस हें कसें? बरें, जाणार तर जा. मला तर आईच्या आज्ञेपेक्षां खेळ अधिक वाटत नाहीं.

---

## धडा ४२.

### वाचन.

चांगलें वाचतां येणें ही गोष्ट फार अगत्याची आहे. ह्या गोष्टीकडे मुळापासून लक्ष दिलें पाहिजे. नाहीं तर एखादी वाईट सवय लागते. आणि एकदा वाईट सवय लागली ह्मणजे ती लवकर जात नाहीं.

थोड्याच मुलांस चांगलें वाचतां येतें. कितीएक मुलें वाचतांना इतकी घाई करितात कीं, तीं काय वाचतात हें दुसऱ्याला समजत नाहीं. कदाचित् त्यांचें त्यांनाही समजत नाहीं. कितीएक


मुलें पुरता उच्चार करीत नाहींत. कितीएक मुलें तोच तो शब्द पुन्हा पुन्हा उच्चारतात. आणि कितीएक तर गाण्याच्या सुरावर वाचतात. असे पुष्कळ प्रकार वाईट वाचण्याचे आहेत.

चांगलें वाचतां यावें ह्याकरितां पहिल्यापासून मुलानें लक्ष्य दिलें पाहिजे. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, आणि विसर्ग ह्यांकडे लक्ष देऊन ज्या शब्दावर किंवा अक्षरावर जोर द्यावयाचा त्याजवरच द्यावा, भलत्यावर देऊं नये. प्रत्येक शब्दाचा उच्चार स्पष्ट करावा. आणि दुसऱ्यास चांगलें ऐकूं जाई असें सावकाश वाचावें. गळ्यावर न वाचतां एरवीं आपण बोलतों तसें वाचावें.

वाचतांना जेथें (,) अशी खूण असेल तेथें अमळ थांबावें; जेथें (;) अशी खूण असेल तेथें त्याहून ज्यास्ती थांबावें; आणि जेथें (.) अशी खूण असेल तेथें पुष्कळ थांबावें. पहिल्या खुणेस स्वल्पविराम ह्मणतात, दुसरीस अर्धविराम, आणि तिसरीस पूर्णविराम ह्मणतात.

## धडा ४३.

## विंचू.



कांहीं विंचू लहान आणि उदी रंगाचे असतात, आणि कांहीं विंचू मोठे व काळ्या रंगाचे असतात. विंचवास आठ पाय व दोन आंकडे असतात, आणि एक नांगी असते; त्या नांगीच्या शेवटास विषाचा कांटा असतो.

विंचू दगडाखालीं किंवा जमिनीच्या भेगेंत, जेथें उजेड नाहीं व ऊन्ह नाहीं अशा ठिकाणीं लपून राहतात. त्यांना लवकर लवकर धांवतां येतें. धांवतांना विंचू आपली नांगी पाठीवर वळवून घेतो.

विंचू किडे मारून खातात. ते पहिल्यानें किडे आपल्या आंकड्यानें धरितात. मग नांगी पाठीवरून मुरडून आणून किड्यांस कांटा मारि-

मग ते किडे लागलेच मरतात.

माणसासही कधीं कधीं नांगी मारितो.

तेव्हां त्याचें विष माणसाच्या आंगांत भिनून माणसास फार वेदना होते. ह्मणून कोणास विंचवानें नांगी मारिली, तर त्या ठिकाणची ती जखम तोंडानें खूप चोखावी, ह्मणजे विष बाहेर येतें, आणि वेदना लवकर नाहींशी होते.

ओंठाची व जिभेची कातडी शाबूत असली तर असें करण्यांत कांहीं भय नाहीं. हें तर काय, पण मोठ्या विखारी सापाच्या डांसाची जखम चोखली तरी देखील भय नाहीं. तोंडांतली कातडी शाबूत असली तर विष बाधावयाचें नाहीं. विषाची शक्ति रक्तावर मात्र चालते. कातडी शाबूत असली ह्मणजे विष रक्ताला पोहोंचत नाहीं, ह्मणून त्याची कांहीं पीडा होत नाहीं.

---

## धडा ४४.

### * कविता.

आर्या.

माता पिता धनी गुरु,
ह्यांची आज्ञा सदैव मानावी ॥
पितरें जन्म, धनी धन

---

*सूचना. ह्या पुस्तकांत जी कविता आहे ती मुलांनी पाठ करावी मात्र.

देती, विद्या अखंड गुरु दावी ॥ १ ॥
जोंवरि आहे तुमचें,
मन कोमल तोंवरी करा विद्या ॥
जून मनीं न शिरे ती,
ग्रासील तुह्मास कीं मग अविद्या ॥ २ ॥
दुष्कर्माचा लोकीं,
घडतो परिणाम फार वाईट ॥
ह्याकारितां त्यापासुनी
दूर रहावेंचि हें दिसे नीट ॥ ३ ॥

अभंग ( दोनचरणी ).

सत्य सर्वदा बोलावें ॥
खोटें सर्वदा टाकावें ॥ १ ॥
सत्य ईश्वरा आवडे ॥
सत्यें सर्व सिद्धि घडे ॥ २ ॥
असत्याचा करा द्वेष ॥
सत्य जोडा अहर्निश ॥ ३ ॥
भांडूं नये बाळकांनीं ॥
दावा धरूं नये मनीं ॥ ४ ॥
उणें कोणा बोलूं नये ॥
शिव्या कोणा देऊं नये ॥ ५ ॥

भलेपणें जे वागती ॥
त्यांची लोक कीर्ति गाती ॥ ६ ॥

---

### धडा ४९.

### कविता.

### बहीणभावांची प्रीति.

अभंग.

कज्जे कफावती, होऊत रस्त्यांत ॥
असावी घरांत, शांति मोठी ॥ १ ॥
बहीण भावंडें, नांदती ज्या स्थळीं ॥
नसावा बा कळी, तेथें कधीं ॥ २ ॥
पक्षी ही लहान, घरटीं बांधोनी ॥
गुण्या गोविंदांनीं, राहताती ॥ ३ ॥
मग जीं शहाणीं, बाळकें आहेत ॥
त्यांमध्यें व्हावेत, कज्जे काय ? ॥ ४ ॥
उखाळ्या पाखाळ्या, काढोनी भांडावें ॥
वर्दळीस यावें, काय, त्यांनीं ? ॥ ५ ॥
एकामेकांवरी, दांत ओंठ खाणें ॥
नाहीं लाजिरवाणें, त्यांस काय ? ॥ ६ ॥
देवराया आतां, लेंकुरबुद्धीचा ॥
झपाटा रागाचा माफ करा ॥ ७ ॥

आणखी आमूच्या, रागाच्या लहरी ॥
काढाव्या बाहेरी, मनांतूनी ॥ ८ ॥
इतर जे मळ, संतापाचें मूळ ॥
धुऊन सकळ, टाका ते ही ॥ ९ ॥
जैसे जैसे आह्मी, प्रौढ वया येऊं ॥
भरूनियां जाऊं, प्रेमानंदें ॥ १० ॥
हीच आहे तूज, मागायाची गोष्ट ॥
होऊनी संतुष्ट, द्यावी आह्मां ॥ ११ ॥

---

## धडा ४६.

### कविता देवाविषयीं.

#### अभंग.

देव पाहतां असे एक ॥
मिथ्या बोलती अनेक ॥ १ ॥
तोचि सर्वांतें निर्मितो ॥
रक्षोनियां लया नेतो ॥ २ ॥
चंद्र सूर्य पृथ्वी तारे ॥
निर्मिले हे त्यानें सारे ॥ ३ ॥
अन्नपाणी तोच देतो ॥
सान थोरां संभाळितो ॥ ४ ॥
माता पिता बंधु खरा ॥
तोच सर्वांचा सोयरा ॥ ५ ॥

दिंडी.

असा मायाळू अन्य कोण आहे ॥
कृपादृष्टी सर्वांस नित्य पाहे ॥
सर्वशक्ती सर्वेश सर्वसाक्षी ॥
सर्व कर्में वाईट बरीं लक्षी ॥ १ ॥

श्लोक.

विद्या नसे ज्या पुरुषास कांहीं ॥
विचार नीति तिळमात्र नाहीं ॥
तया नरा काय अहो ह्मणावें ॥
पशूंमध्यें सत्य तया गणावें ॥ १ ॥
उमाळ्यांवरी जेधवां सूर्य आला ॥
पळाली निशा चंद्र निस्तेज झाला ॥
प्रकाशामुळें लोपल्या सर्व तारा ॥
मिळेना कुठें ठाव त्या अंधकारा ॥ २ ॥
वृक्षावरी बैसुनियां प्रभातीं ॥
पक्षी पहा मंजुळ शब्द गाती ॥
ते चोंचिनें पंखहि शोधिताती ॥
चरावयालागिं उडोनि जाती ॥ ३ ॥

समाप्त.

